जा.क्र. जि.प.ग./बां.वि./स.ले.अ/दंड
आकारणी/ 6137 /2020
कार्यालय, कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, गडचिरोली.
दिनांक : 26/11/2020

वाचावे :- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली (बांधकाम विभाग) यांचे आदेश क्र. जिपग/बांवि/सलेअ/1815/2014, दिनांक 28-04-2014.

**- कार्यालयीन आदेश -**

उपरोक्त वाचावे मधील आदेशान्वये जिल्हा परिषदे अंतर्गत करण्यात येणा-या बांधकामाची कामे विहीत मुदतीत पुर्ण न झाल्यास त्यावर दंडात्मक कारवाई करुन दंडाची रक्कम आकरणी करणेबाबत दर निश्चीत करण्यात आले होते.

वाटप केलेली कामे विहितीत मुदतीत पुर्ण न झाल्यामुळे जनतेस आवश्यक सुविधा मिळण्यास विलंब होते. त्यामुळे विहीत मुदतीत पुर्ण न होणा-या कामांकरिता कंत्राटदारांकडून दंड वसूल करणे आवश्यक आहे. तसेच उपरोक्त दर निश्चीत करुन 6 वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने त्यात सुधारणा करणे देखील आवश्यक आहे.

त्यामुळे बांधकाम विभागाकडून 3054 व 5054 मार्ग व पुल, 2059-सार्वजनिक बांधकामे, 2210-सर्वजनिक आरोग्य, 2403-पशुसंवर्धन, 13-वने, जिल्हा निधी, खासदार व आमदार निधी, विशेष कृती कार्यक्रम (SAP), एकात्मीक कृती कार्यक्रम (IAP), अंगणवाडी बांधकाम, शाळा बांधकाम व इतर योजना अंतर्गत काम वाटप समिती द्वारे व ई-निविदेद्वारे वाटप करण्यात येणारी कामे विहीत विहीत मुदतीत पुर्ण न झाल्यास त्यावर यासोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार दंड आकारण्यात यावा. सदर दंड हा कामाच्या देयकाच्या रकमेवर आकारण्यात यावा व दंडाची रक्कम कामाच्या देयकातून कपात करण्यात यावी. यासोबत जोडलेल्या विवरणपत्रात दंडाची रक्कम टक्केवारी मध्ये देण्यात आली आहे. निविदा शाखेने विवरणपत्रात दिलेला कालावधी व टक्केवारी प्रमाणे करारनाम्याच्या रकमेच्या तुलनेत प्रतिदिवस दंडाची रक्कम परिगणना करुन कार्यारंभ आदेशात नमूद करावी. तसेच जे कंत्राटदार विहीत मुदतीत काम पुर्ण करणार नाही अशा कंत्राटदारांची नावे नियमानुसार काळया यादीत टाकण्यात यावी.

सदर आदेश खुल्या निविदा धारक कंत्राटदार, सुशिक्षीत बेरोजगार अभियंता, मजुर सहकारी संस्था व ग्रामपंचायत यांना लागू राहील. तसेच नियंत्रणाबाहेरील तांत्रीक अडचणी, नैसर्गीक आपत्ती व असामाजीक तथ्यामुळे काम बंद राहिल्यास सदर दंडात्मक कार्यवाही शिथील करण्याचे अधिकार प्रकरणपरत्वे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करुन व त्यांचे संमतीने अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. गडचिरोली यांना राहील.

सदर आदेश हे आदेश दिनांकापासून वाटप समिती द्वारे व ई-निविदेद्वारे वाटप करण्यात येणा-या सर्व कामांना लागू राहतील. आदेशाची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, गडचिरोली.

**प्रत माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित -**

1. अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली.
2. मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली.
3. कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, गडचिरोली.
4. विभाग प्रमूख (सर्व) ---- निवीदा शाखा (बांधकाम विभाग) जि.प. गडचिरोली
5. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) ----

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, गडचिरोली.

अपर मुख्य कार्यकारी अधिकारी,
जि.प., गडचिरोली.

मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी,
जि.प., गडचिरोली.

कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जि.प., गडचिरोली.

(13)

## कार्यालय, कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, गडचिरोली.

या कार्यालयाचे आदेश क्र. जि.प.ग./बां.वि./स.ले.अ/दंड आकारणी/ /2020, दिनांक चे विवरणपत्र.

| अ.क्र. | बांधकाम पुर्ण करण्याचा कालावधी | विलंब कालावधी (दिवसामध्ये) | दंड (टक्केवारी) |
|---|---|---|---|
| 1 | 1 ते 4 महिने | 30 दिवसा पर्यंत | निरंक |
| | | 31 ते 45 दिवस / काम पुर्ण होई पर्यंत | 10 % |
| 2 | 5 ते 8 महिने | 30 दिवसा पर्यंत | निरंक |
| | | 31 ते 60 दिवसा पर्यंत | 4 % |
| | | 61 ते 90 दिवस / काम पुर्ण होई पर्यंत | 6 % |
| 3 | 9 ते 12 महिने | 1 ते 60 दिवसा पर्यंत | निरंक |
| | | 61 ते 90 दिवसा पर्यंत | 2 % |
| | | 91 ते 120 दिवसा पर्यंत | 3 % |
| | | 121 ते 150 दिवस / काम पुर्ण होई पर्यंत | 5 % |
| 4 | 13 ते 18 महिने | 1 ते 60 दिवसा पर्यंत | निरंक |
| | | 61 ते 90 दिवसा पर्यंत | 1.5 % |
| | | 91 ते 120 दिवसा पर्यंत | 2 % |
| | | 121 ते 150 दिवसा पर्यंत | 3 % |
| | | 151 ते 180 दिवस / काम पुर्ण होई पर्यंत | 3.5 % |
| 5 | 19 ते 24 महिने | 1 ते 60 दिवसा पर्यंत | निरंक |
| | | 61 ते 90 दिवसा पर्यंत | 1 % |
| | | 91 ते 120 दिवसा पर्यंत | 1.5 % |
| | | 121 ते 150 दिवसा पर्यंत | 2 % |
| | | 151 ते 180 दिवसा पर्यंत | 2.5 % |
| | | 181 ते 210 दिवस / काम पुर्ण होई पर्यंत | 3 % |

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, गडचिरोली.

अपर मुख्य कार्यकारी अधिकारी,
जि.प., गडचिरोली.

मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी,
जि.प., गडचिरोली.

कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जि.प., गडचिरोली.

Signature Not Verified
Digitally signed by NARAYAN BABAN SARDAR
Date: 2026.04.17 15:49:59 IST
Location: Maharashtra-MH